**सहपत्र 'अे'**

**सहपत्र 'बी'**

# (शस्त्र अधिनियम १९५९ मधील कलम-१३)

**सैन्यदल/पोलीस विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी नवीन शस्त्र परवाना मिळणेसाठी करावयाच्या अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे.**

१.एक खिडकी येथील नवीन शस्त्र परवाना मिळणेबाबतचा रु. १००/- चा विहीत नमुन्यातील अर्ज.

२.अर्जदाराचा वयाच्या पृष्ठयर्थ पुरावा :-
जन्म तारखेचा दाखला/शाळा सोडलेचा दाखला/इयत्ता १० वी पासचे बोर्ड सर्टिफिकेट/पॅनकार्ड/पासपोर्ट/सेवापटाचे पहिल्या पानाची साक्षांकीत प्रत इत्यादी. *

३.अर्जदार यांनी रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर त्यांना कोणत्याही गुन्हयात अटक, शिक्षा झाली नसलेबाबत तसेच कोर्टात त्यांचेविरुध्द खटला प्रस्तावित/प्रलंबित नसलेबाबत नोटरी/मॅजिस्ट्रेट समोर केलेले प्रतिज्ञापत्र.

४.ज्या कारणासाठी शस्त्र परवाना हवा आहे त्या संबंधीचा पुरावा.
अ) शेतीचे संरक्षण :- चालू वर्षाचा ७/१२ उतारा / ८ अ चा अद्ययावत उतारा *
ब) मालमत्ता संरक्षण :- अर्जदाराचे नांवे असलेल्या मालमत्तेचा तपशिल दर्शविणारे विवरण व त्यानुसार मालमत्तेच्या पावत्या इत्यादी.
क) स्वसंरक्षणार्थ :- अर्जदार यांना खंडणीसाठी किंवा इतर कारणांसाठी जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे किंवा त्यांच्यावर प्रत्यक्ष हल्ला किंवा हल्ल्याचा प्रयत्न झाला असल्यास त्याबाबत पोलीस ठाणेस नोंदविलेल्या प्रथम खबरी अहवालाची (FIR) प्रत.

५. अर्जदार यांच्या नोकरी बाबत पुरावा.
धारण करीत असलेले पद, खाते, मासिक वेतन, अर्जदार केव्हापासून नोकरीत आहेत व केव्हा सेवानिवृत्त होणार आहेत वगैरे बाबी दर्शविणारे संबंधीत युनिट प्रमुख यांचे प्रमाणपत्र.

६. अर्जदार यांना शस्त्र परवाना देणेस हरकत नसलेबाबतचे संबंधीत युनिट प्रमुखाचे शिफारस पत्र.

७. अर्जदार यांना सेनामुख्यालयाकडून शस्त्र मिळाले आहे काय ? किंवा मिळणार आहे काय ? याबाबत सैन्य दलाने शस्त्र ॲलॉट केले बाबतचे किंवा ॲलॉट करण्यात येणार असलेबाबतचे सैन्यदलाचे पत्र.

८. पुणे शहरात स्थावर मालमत्ता आहे काय ? पुणे शहरात स्थायीक होणार असल्या संबंधी विश्वासार्ह पुरावा.
(प्रॉपर्टी कार्ड/वीज बील/म.न.पा. किंवा कॅन्टोनमेंटकडील मिळकतकर देयक/५ वर्षापेक्षा जास्त काळ एकाच ठिकाणी भाडयाने राहत असल्यास भाडे करार किंवा घर मालकाचे प्रतिज्ञापत्र) *

९. दूसऱ्या इसमाचे शस्त्र ट्रान्सफर करुन हवे असल्यास ज्या व्यक्तीचे शस्त्र ट्रान्सफर करावयाचे आहे त्यांचेसह त्यांचे वारसांचे नोटराइजडं संमती पत्र.

१०.मयत इसमाचे शस्त्र ट्रान्सफर करुन हवे असल्यास मयत इसमाच्या वारसांचे नोटराइजड संमती पत्र.

***(सदर यादीतील कोणताही एक पुरावा ग्राहय धरला जाईल)**
****(उपरोक्त अ.क्र.९ व १० हे फक्त शस्त्र ट्रान्सफर प्रकरणासाठी लागू राहील)**
(टिप :-**या व्यतिरिक्त आवश्यक्तेनुसार सक्षम प्राधिकारी सुचवतील ती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**)